(31)
(129)

संदर्भ - १) शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्रमांक एलएनडी-१०७१/१८३७३६अ-दोन दिनांक ९.९.१९७१
२) शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्रमांक जमीन १०९१/७१३/प्रक्र५९/ज-१ दिनांक २८ जून १९९९
३)प्रकल्प समन्वयक डी.पी.ए.पी. तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांचे पत्र क्र.बांधकाम/२००० दिनांक १५.५.२०००
४) उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे पत्र क्रमांक जमा/सीआर/१९ दिनांक ३१/३/२००१ व दिनांक १२/७/२००१

क्रमांक२०००/मशाका/२/जमाबंदी-१/१८४
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक - १/९/२००१

## आ दे श

उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांनी त्यांचे संदर्भ पत्र क्रमांक ४ नुसार मौजे सौदांणा ता.केज येथील गायरान स.न. २५ मधून ५ गुंठे जमीन जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम अंतर्गत शाळेची इमारत बांधकामासाठी प्रकल्प समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना जमीन देणे बाबत प्रस्ताव सादर केला आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २२ नुसार व शासनाच्या संदर्भ क्रमांक १ व २ मधील पत्रकानुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून जिल्हाधिकारी बीड हे मौजे सौंदाणा ता.केज येथील गायरान जमीन स.न. २५ मधून ५ गुंठे जमीन ५% गायरान राखून ठेवण्याची अट शिथील करून प्रकल्प समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत शाळेच्या इमारतीचे बांधकामासाठी खालील अटीवर वर्ग करण्यास आदेशीत करीत आहे.

१) ज्या कारणासाठी जमीनीचे विनियोजन करण्यात आले आहे तिचा वापर त्याच कारणासाठी केला गेला पाहिजे. त्या जमिनीचे हस्तांतरण विक्री, किंवा लिजवर खाजगी व्यक्तीस किंवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही.

२) उपरोक्त जमीनीची त्या खात्यास जेव्हा आवशक्ता नसेल तेव्हा ती जमीन महसूल विभागास परत करावी लागेल व त्या जमिनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमानुसार करण्यात येईल.

जिल्हाधिकारी बीड

प्रतिलिपी-

१) मा.सचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर.
२) मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
३) उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई
४) प्रकल्प समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड
५) तहसीलदार केज यांना देवून कळविण्यात येते की, तालुका निरिक्षक भुमी अभिलेख केज यांचेकडून या जमिनीची मोजणी करून घेवून मोजणी नकाशा प्राप्त करून घेवून जमिनीचा ताबा प्रकल्प समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना देण्यात यावा व कब्जे पावती व पंचनाम्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.
६) तालुका निरिक्षक भुमी अभिलेख केज यांना देवून कळविण्यात येते की, सोबतच्या स्थळदर्श नकाशानुसार जमिनीची मोजणी करून मोजणी नकाशाची प्रत तहसीलदार केज यांना व या कार्यालयास पाठवावी.

जिल्हाधिकारी बीड करिता

ISSUED
DESPATCH CLERK;
COLLECTORATE, BEED

संदर्भ:-१] शासन महसूल व वन विभाग परिपत्र -१०७१/१८३७३६ अ-दोन
दिनांक ९.९.१९७१

२] शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र.जमीन १०९१/७१३/प्र.क्र.५९/ज-१
दिनांक २८ जून १९९९.

३] प्रकल्प समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड
यांचे पत्र क्र. जिप्रशिकाबो/बांधकाम/९९/९६६ दिनांक १४.७.९९

४] उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे पत्र क्र.२०००/जमाबंदी/१६८
दिनांक २३.३.२०००

क्र.२०००/मशाका/२/[जमीन१/काबि/५३४
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक 2 /मे/२०००

:: आ दे श ::
===============

उपविभागीय अधिकारी बीड अंबाजोगाई यांनी त्यांचे संदर्भ क्र.४ वरील पत्रकान्वये तेलेवाडी तहत मांगवडगांव ता.केज येथे जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम अंतर्गत शाळेची इमारत बांधकामासाठी स.न.१८९ मधून प्रकल्प समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना जमीन देणे बाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियिम १९६६ चे कलम २२ नुसार व शासनाचे संदर्भ क्र.१ व २ वरील परिपत्रका द्वारे प्राप्त झालेल्या अधिकाराची वापर करुन मी जिल्हाधिकारी बीड मौ.मांगवडगांव ता.केज येथील गायरान जमीन स.न.१८९ मधून १० गुंठे जमीन ५ % गायरान राखून ठेवण्याची अट शिथील करुन प्रकल्प समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांना जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमा अंतर्गत शाळेच्या इमारतीचे बांधकामासाठी खालील अटीवर वर्ग करण्यास आदेशीत करतो.

१] ज्या कारणासाठी जमीनीचे विनियोजन करण्यात आले आहे. तिचा वापर त्याच कारणसाठी केला गेला पाहिजे. त्या जमिनीचे हस्तांतरण विक्रि किंवा लिजवर खाजगी व्यक्तीस किंवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

२] उपरोक्त जमीनीची त्या खात्यास जेंव्हा आवश्यकता नसेल तेंव्हाती जमीन महसूल विभागास परत करावी लागेल व त्या जमीनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमा नुसार करण्यात येईल.

स्वाक्षरीत
जिल्हाधिकारी बीड.

पान वर वरपहा....

(143)



प्रतिलीपी,

१] मा. सचिव महसुल व वन विभाग मंत्रालय मुबंई-३२ यांना माहितीस्तव. सादर.

२] मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

३] उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई

४] प्रकल्प समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड

५] तहसिलदार केज यांना देवून कळविण्यात येते की, तालुका निरिक्षक भूमी अभिलेख केज यांचे कडून या जमिनीची मोजणी करुन घेऊन मोजणी नकाशा प्राप्त करुन घेऊन जमिनीचा ताबा प्रकल्प समन्वयक तथा मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांना देण्यात यावा व कब्जे पावती व पंचनाम्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.

६] तालुका निरिक्षक भूमी अभिलेख केज याना देवून कळविण्यात येते की, सोबतच्या स्थळदर्शक नकाशा नुसार जमिनीची मोजणी करुन मोजणी नकाशाची प्रत तहसिलदार केज याना व या कार्यालयास पाठवावी.

जिल्हाधिकारी बीड करीता